# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
## दि.२९/०७/१० रोजी झालेल्या मंडळाच्या २५६ व्या बैठकीचे ठराव.

**चर्चेचा विषय :**

**म्हाडाच्या अधिकारी/कर्मचा-यांना म्हाडा कायदा कलम १७५,१७६ अन्वये संरक्षण मिळण्यासाठी प्राधिकरणाकडे मुंबई मंडळाने शिफारस करावी. म्हाडाच्या अधिकारी/कर्मचा-यांना म्हाडा कायदा १७५,१७६ अन्वये संरक्षण मिळाले नाही तर,विकास कामात अडचणी निर्माण होतील. तसेच,रहिवाशांनी दिलेली ७०% संमती रिव्होकेबल असावी,अन्यथा रहिवाशी चार-पाच विकासक बदलत राहतात. त्यामुळे,पुनर्विकासाचे काम होत नाही.**

**ठराव क्र.२५६/ २८३३** **दि. २९/०७/२०१०**

याचिका क्र. १८४५/०९ सुनावणीचेवेळी मा. उच्च न्यायालयाने शासनाचा १९७२ चा लाच लुचपत प्रतिबंधक बाबतचा शासन निर्णय अस्थित्वात नाही असे गृहित धरून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने कार्यवाही करावी,असे रोजनाम्यामध्ये आदेश जारी केले आहेत. त्यामुळे, याचिका क्र. १८४५/०९ मधील इ. क्र. ६२ अक्षय गृह. नि. संस्था टिळकनगर, चेंबुर या इमारतीबाबतीच्या पुनर्विकासास म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी चालू आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने २८ शासकीय कर्मचा-यां विरोधात एफ. आर. आय. दाखल केला आहे. मुंबई मंडळाने विधी सल्लागार /प्राधिकरण यांना याचिका क्र. १८४५/०९ मध्ये इंटरविन करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी. म्हाडा कायदा १७५/१७६ अन्वये म्हाडाचे/मंडळाचे सदस्य अधिकारी आणि कर्मचारी यांना गुडफेथ अन्वये कार्यवाही केली असल्यामुळे,मा.उच्च न्यायालयातील याचिका क्र.१८४५/०९ मध्ये इंटरवीन करुन, म्हाडाचे/मंडळाचे सदस्य अधिकारी आणि कर्मचारी यांना संरक्षित करण्यासाठी आणि सदरहू चौकशी उच्च स्तरीय समितीमार्फत करण्यासाठी मुंबई मंडळ प्राधिकरणास शिफारस करीत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/२ : गांधीनगर-वांद्रे-पूर्व या म्हाडा वसाहतीतील कार्यालयीन इमारत क्र.०१,न.भू.क्र.६३५पै.,आणि ६३५/९५,मौजे-वांद्रे-पूर्व.,च्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८३४** **दि. २९/०७/२०१०**

गांधीनगर-वांद्रे-पूर्व या म्हाडा वसाहतीतील कार्यालयीन इमारत क्र.०१, न.भू.क्र.६३५पै., आणि ६३५/९५,मौजे-वांद्रे-पूर्व.मुंबई संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. विकासकास ५१०.२० चौ.मी.पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. विकासकास एकूण पोटविभाजीत भूखंड ५१०.२० चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक १२७५.५० चौ.मी.आहे.यामधून विकासकास अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ५१०.२० चौ.मी.वजा केल्यास उर्वरित ७६५.३० चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. विकासकाने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित ७६५.३० चौ.मी. चटईक्षेत्र विकासकास वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ६०% दराने (रु.५४,८००/- च्या ६० % दराने म्हणजेच रु. ३२,८८०/- प्रती चौ.मी. रहिवासी वापरासाठी) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/३ : टिळकनगर-चेंबूर या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.१२१,चेंबूर हंस**

**निकेतन सह.गृह.संस्था.मर्या., न.भू.क्र.३२ आणि १८३२ पै., चेंबूर या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८३५** **दि. २९/०७/२०१०**

टिळकनगर-चेंबूर या म्हाडा वसाहतीतील इमारत क्र.१२१,चेंबूर हंस निकेतन सह.गृह.संस्था. मर्या.,संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. संस्थेच्या ८८९.२५ चौ.मी.पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. संस्थेस एकूण पोटविभाजीत भूखंड ८८९.२५ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक २२२३.१२ चौ.मी. + ८२८.२० चौ.मी. (४१.४१ चौ.मी. x २० गाळे) = ३०५१.३२ चौ.मी आहे.यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ = १११८.५१ चौ.मी.वजा केल्यास उर्वरित १९३२.८१ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. संस्थेने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित १९३२.८१ चौ.मी. चटईक्षेत्र संस्थेस वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.१८,८००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. ७५२०/- प्रती चौ.मी. रहिवासी वापरासाठी) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/४ : साने गुरुजी नगर,गोरेगाव-प., या म्हाडा वसाहतीतील कार्यालयीन इमारत क्र.५,न.भू.क्र.४८ पै., मौजे-पहाडी गोरेगाव-प., मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण**

**नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८३६** **दि. २९/०७/२०१०**

साने गुरुजी नगर,गोरेगाव-प., या म्हाडा वसाहतीतील कार्यालयीन इमारत क्र.५ संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. अर्जदारास ६१६.०० चौ.मी..पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. अर्जदारास एकूण पोटविभाजीत भूखंड ६१६.०० चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक १५४० चौ.मी.आहे.यामधून अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ७२.९१ चौ.मी.वजा केल्यास उर्वरित १४६७.०९ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित १४६७.०९ चौ.मी. चटईक्षेत्र अर्जदारास वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.३३,२००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १३,२८०/- प्रती चौ.मी. रहिवासी वापरासाठी) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/५ : शास्त्रीनगर,गोरेगांव-प., या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रं.१२ शास्त्रीनगर श्री गणेश सह.गृह.संस्था.मर्या.,न.भू.क्र.२२२ पै., मौजे-गोरेगाव-प.,मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत**

**विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८३७** **दि. २९/०७/२०१०**

**शास्त्रीनगर,गोरेगांव-प., या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रं.१२ शास्त्रीनगर श्री गणेश सह.गृह.संस्था.मर्या., संस्थेने मागणी केल्यानुसार,**

१. संस्थेच्या (१०८१.०० + ७७.२२ + १३१.३५ ) = १२८९.५७ चौ.मी.पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. संस्थेस एकूण पोटविभाजीत भूखंड (१०८१.०० + ७७.२२ + १३१.३५ ) = १२८९.५७ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक २८९५.५५ चौ.मी.आहे. यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ (१०७३.२० + २८०.०० + २४.००) = १३७७.२० चौ.मी. वजा केल्यास उर्वरित १५१८.३५ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. संस्थेने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित १५१८.३५ चौ.मी. चटई क्षेत्रापैकी २१७.९३ संस्थेस रहिवाशी वापरासाठी वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.३३,२००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १३,२८०/- प्रती चौ.मी.) व संस्थेस १३००.४२ चौ.मी. वाणिज्य वापर क्षेत्र म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ६०% दराने (रु.३३,२००/- च्या ६० % दराने म्हणजेच रु. १९,९२०/- प्रती चौ.मी.) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. संस्था सहकार कायदयाच्या आधारे संस्थांचे एकत्रिकरण (**कागदोपत्री व प्रत्यक्षात**) नियमानुसार करुन घेईल. संस्थांच्या एकत्रिकरणाची प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. या अटीवर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/६ : शास्त्रीनगर,गोरेगांव-प., या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रं.२३ शास्त्रीनगर समाधान सह.गृह.संस्था.मर्या., न.भू.क्र.२२० पै., मौजे-गोरेगाव -प., मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८३८** **दि. २९/०७/२०१०**

शास्त्रीनगर,गोरेगांव-प., या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रं.२३ शास्त्रीनगर समाधान सह.गृह.संस्था.मर्या संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. संस्थेच्या ११२३.९८ चौ.मी. पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. संस्थेच्या एकूण पोटविभाजीत भूखंड ११२३.९८ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक २८०९.९५ चौ.मी.आहे.यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ (१०७२.९६ + ३०४.००) = १३७६.९६ चौ.मी.वजा केल्यास उर्वरित १४३२.९९ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. संस्थेने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित १४३२.९९ चौ.मी. चटईक्षेत्र संस्थेस वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.३३,२००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १३,२८०/- प्रती चौ.मी. रहिवासी वापरासाठी) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३.	सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/७ : सुंदरनगर-कालीना सांताक्रुझ-पूर्व., येथील इमारत क्र.१०, सुंदरनगर सिध्दीविनायक सह.गृह.संस्थेच्या पुनर्बांधणीबाबत.**

**ठराव क्र.२५६/ २८३९** **दि. २९/०७/२०१०**

सुंदरनगर-कालीना सांताक्रुझ-पूर्व., येथील इमारत क्र.१०,सुंदरनगर सिध्दीविनायक सह.गृह. संस्थेने मागणी केल्यानुसार,

१.	संस्थेस ११७.१२ चौ.मी. अतिरीक्त भूखंड प्राधिकरण ठराव क्र.६४२२ अन्वये भाडेपट्टा करारनाम्यात समाविष्ट करुन वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२.	संस्थेच्या लगतचे एकूण २७५.७१ चौ.मी. मैदानाचे क्षेंत्रफळ म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या १०% दराने (रु.३९,६००/- च्या १० % दराने म्हणजेच रु. ३९६०/- प्रती चौ.मी.) वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/८ : जागतीक बँक प्रकल्प,सर्व्हे क्र.१२०,वर्सोवा या वसाहतीमधील रस्ता क्र.आर.एस.सी-०६ लगत क्रिडांगणाचे मैदानासाठी आरक्षित असलेला २३९१.८२ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड वितरणाबाबत.**

**ठराव क्र.२५६/ २८४०** **दि. २९/०७/२०१०**

१. जागतीक बँक प्रकल्प,सर्व्हे क्र.१२०,वर्सोवा या वसाहतीमधील रस्ता क्र.आर.एस.सी-०६ येथील नॅशनल एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेस संस्थेच्या लगतचा २३९१.८२ चौ.मी. क्रिडांगणासाठीचा क्षेत्रफळ म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या १०% दराने (रु.४३,५००/- च्या १० % दराने म्हणजेच रु. ४,३५०/- प्रती चौ.मी.) वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/९ : चुनाभट्टी दहिसर पूर्व या वसाहतीचा पूर्वविकास म्हाडा व विकासक व मे. सदगुरु बिल्डर्स व डेव्हलोपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने सुधारीत विकास नियंत्रण ३३(५) अंतर्गत करणेबाबतचा प्रस्ताव.**

**ठराव क्र. २५६/२८४१** **दि. २९/०७/२०१०**

चुनाभट्टी दहिसर पूर्व या वसाहतीचा पूर्वविकासा बाबत विकासक व मे. सदगुरु बिल्डर्स व डेव्हलोपर्स आणि धनश्री डेव्हलपर्स यांचेकडून सुधारीत विकास नियंत्रण ३३(५) अंतर्गत संयुक्त पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ/मुं.मं. यांनी दोन्ही प्रस्तावांतून मुंबई मंडळास मिळणारा महसूल / सदनिका, रहिवाशांना मिळणा-या सुविधा व

प्रस्तावाची सक्षमतेच्या अनुषंगाने अभिप्राय पुढील बैठकीत मुंबई मंडळाच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर करावा.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/१० : शास्त्रीनगर, गोरेगांव-प., या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रं. ६ शास्त्रीनगर वसुंधरा सह. गृह. संस्था. मर्या., न. भू. क्र. २१९ पै., मौजे पहाडी गोरेगाव - प., मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८४२** **दि. २९/०७/२०१०**

शास्त्रीनगर, गोरेगांव-प., या म्हाडा वसाहतीतील इमारत क्रं. ६ शास्त्रीनगर वसुंधरा सह. गृह. संस्था. मर्या.,संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. संस्थेच्या १३७६.१२ चौ.मी.पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. संस्थेस पोटविभाजीत भूखंड १३७६.१२ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक ३४४०.३० चौ.मी.आहे.यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ (१०७३.२० + ३०४.००) = १३७७.२० चौ.मी.वजा केल्यास उर्वरित २०६३.१० चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. संस्थेने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित २०६३.१० चौ.मी. चटईक्षेत्रफळापैकी १७८०.६६ चौ.मी. संस्थेस वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.३३,२००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १३,२८०/- प्रती चौ.मी. रहिवासी

वापरासाठी) व २८२.४४ चौ.मी. वाणिज्य वापर क्षेत्र म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ६०% दराने (रु.३३,२००/- च्या ६० % दराने म्हणजेच रु. १९,९२०/- प्रती चौ.मी.) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/११ : चित्तरंजन नगर,घाटकोपर-पूर्व., या म्हाडा वसाहतीतील इ.क्र. सी-१ ते सी-५ चित्तरंजन नगर प्रमोद सह.गृह.संस्था. मर्या., न.भू.क्र.१००४ पै., घाटकोपर-किरोळ,मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८४३** **दि. २९/०७/२०१०**

चित्तरंजन नगर,घाटकोपर-पूर्व., या म्हाडा वसाहतीतील इ.क्र.सी-१ ते सी-५ चित्तरंजन नगर प्रमोद सह.गृह.संस्था. मर्या.,संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. संस्थेस (२६५९.५२ + १५४७.८९) = ४२०७.४१ चौ.मी.पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. एकूण एकूण पोटविभाजीत भूखंड (२६५९.५२ + १५४७.८९) = ४२०७.४१ चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक १०५१८.५२ चौ.मी.आहे. यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ २४३०.३४ चौ.मी.वजा केल्यास उर्वरित ८०८८.१८ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. संस्थेने मागणी

केल्याप्रमाणे उर्वरित ८०८८.१८ चौ.मी. संस्थेस वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.३१,५००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १२,६००/- प्रती चौ.मी. रहिवासी वापरासाठी) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

विकासकास देकार पत्र जारी करण्यात यावे.विकासकाने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्रमांक २५६/१२ : पंतनगर,घाटकोपर-पूर्व., या म्हाडा वसाहतीतील इ.क्र.६, पंतनगर ध्रुवतारा सह. गृह. संस्था मर्या., न.भू.क्र.५७३६ पै., घाटकोपर-मुंबई या इमारतीच्या पुनर्विकासाकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), नुसार म्हाडाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेल्या प्रस्ताव.**

**ठराव क्र.२५६/ २८४४** **दि. २९/०७/२०१०**

**पंतनगर,घाटकोपर-पूर्व., या म्हाडा वसाहतीतील इ.क्र.६, पंतनगर ध्रुवतारा सह. गृह. संस्था मर्या., न.भू.क्र.५७३६ पै.,** संस्थेने मागणी केल्यानुसार,

१. संस्थेच्या (७०५.९७ + १५१.५३ + १२२.५० ) = ९८०.०० चौ.मी. चौ.मी.पोट विभाजीत भूखंडावर शासन निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांक वापर करुन,विकास करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

२. संस्थेस एकूण पोटविभाजीत भूखंड (७०५.९७ + १५१.५३ + १२२.५० ) = ९८०.०० चौ.मी. भूखंडावर २.५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण चटईक्षेत्र निर्देशांक २४५०.०० चौ.मी. उपलब्ध आहे.यामधून संस्थेचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ व इतर क्षेत्रफळ (८८३.२० + ८११.१२ + ३७३.००) = २०६७.३२ चौ.मी.वजा केल्यास उर्वरित

३८२.६८ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते. संस्थेने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित ३८२.६८ चौ.मी.  चौ.मी. चटईक्षेत्रापैकी संस्थेने ३००.०० चौ.मी. क्षेत्रफळाची रहिवाशी वापरासाठी मागणी केलेली आहे. संस्थेस ३००.०० चौ.मी. रहिवाशी क्षेत्र वितरीत केल्यास, म्हाडाचा ठराव क्र.६२६० अन्वये रेडि रेकनर २०१० दराच्या ४०% दराने (रु.३१,५००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १२,६००/- प्रती चौ.मी. रहिवासी वापरासाठी) दराने वितरीत करण्यास मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

३. सदरहू ठराव स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मुंबई मंडळ प्रशासनास अनुमती देत आहे.

संस्थेला देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक रक्कम व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

ठराव एकमताने मंजूर.

**<u>मा.सभापती/मुं.मं. यांच्या परवानगीने आलेले चर्चेचे विषय.-</u>**

**रहिवांश्यांकडून पूर्नविकासासाठी ७०%  संमती बाबत शासनाच्या दिनांक ०३/०१/०९ रोजीच्या निर्णयाची योग्य रितीने अंमलबजावणी करण्याबाबत**

**ठराव क्र.२५६/ २८४५ दि. २९/०७/२०१०**

महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने ३/०१/२००९ रोजी इमारतीचा पूर्नविकास करताना रहिवाश्यांची संमती घेताना मार्गदर्शक तत्वे शासन निर्णयानुसार जाहीर केली आहेत. म्हाडाकडे पुर्नविकास चालु असलेल्या इमारती वेगवेगळया टप्यात आहेत जसे की, ०३/०१/०९ रोजी पूर्वी/नंतर चालू असलेली कामे इमारती तुटलेल्या आहेत व रहीवाशी संक्रमण शिबीरात / अन्यत्र / त्याच इमारतीत राहतात काही इमारती पूर्वीच्या बांधकामासाठी ना हरकत प्रमाणपत्र घेतले / काहींनी १.२/२.४ चटई क्षेत्र अन्वये मान्यता घेतली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने ३/०१/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील

मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे, हे संबंधीत गृहनिर्माण संस्थेस बंधनकारक आहे.म्हाडाने इमारतीच्या पुनर्विकासास ना हरकत प्रमाणपत्र जारी करतांना, संबंधीत गृहनिर्माण संस्थेने

शासनाच्या सहकारी खात्याच्या दि.०३/०१/०९ रोजीच्या शासन निर्णयाचे पालन करावे, अशा अटीवर देकारपत्र / ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात यावे. या साठी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांचे मान्यतेसाठी प्राधिकरणास पाठविण्यासाठी मुंबई मंडळ शिफारस करीत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**दि.१८/८/२०१० रोजी झालेल्या बैठक क्र.२५७ मध्ये ठराव मंजूर झाले नाही.**